# उजळत्या वाटा - BeingwithYou Help Foundation

**- माधवी ठाकूरदेसाई**

'छोटे कुटुंब सुखी कुटुंब' म्हणून आजकाल छोट्या कुटुंबाला प्राधान्य दिले जात आहे; त्यामुळे कुटुंबातील सदस्यांची संख्याही कमी असते. प्रत्येक गोष्टीचे फायदे तोटे दोन्ही असतात. परंतु घरातील एखाद्या व्यक्तीच्या आजारपणात जेव्हा हॉस्पिटलच्या वाऱ्या सुरू होतात तेव्हा मात्र मदतीचे हात कमी पडू लागतात. कोणीतरी मदतीला असावे असे वाटते. माझ्याही बाबतीत तेच घडले. मिस्टरांना सख्खे भावंड कुणी नसल्यामुळे सासूबाई आणि सासऱ्यांच्या आजारपणात आमची दोघांची तारेवरची कसरत सुरू असे. मुलगी लहान होती. तिची शाळा, अभ्यास, मिस्टरांचे ऑफिस आणि हॉस्पिटल या सगळ्यात, मी जाईपर्यंत पेशंटजवळ एखाद तासभर थांबण्यासाठी



कोणाची तरी मदत मिळावी असे फार वाटे, पण नाही मिळाली. तसेच मुंबईत माझी आई चालता येत नसल्याने अंथरूणाला खिळून होती, ती बहिणीकडे रहात होती. आम्ही अधून मधून मुंबईला जात असू, पण दहा पंधरा दिवसांपेक्षा जास्त राहणे शक्य नव्हते. बरेचदा ऑफिसला जाताना तिला एकटं ठेऊन कुलूप लावून जावे लागे. त्यावेळीही कोणाच्या तरी मदतीची गरज होती पण मिळाली नव्हती. पुढे सासू-सासरे आणि आई यांच्या निधनानंतर मनात सतत विचार सुरू होते की अशी सेवा लोकांना मिळणे गरजेचे आहे, ती आपण सुरू करावी.

अशा रितीने २६ जानेवारी २०१९ रोजी आमच्या कामाची मुहूर्तमेढ रोवली गेली. जानेवारी २०१९ पासून आत्तापर्यंत आम्ही ३००० तासांची विनामूल्य सेवा घरी किंवा हॉस्पिटलमध्ये जरूरी प्रमाणे दिली आहे.

घरातील कोणी आजारी असले म्हणजे पेशंटच्या जवळच्या व्यक्तीची, त्यात गृहिणींची फार धावपळ होत असते. आजच्या काळात नवरा बायको दोघांनी नोकरी करणे अत्यंत गरजेचे झाले आहे. आजारपण वाढले तर जास्त सुट्ट्या मिळणेही शक्य नसते आणि अशावेळी मदतीची अत्यंत गरज भासत असते. नातेवाईक सुद्धा सुरुवातीला मदतीला येतात पण आजारपण लांबले की त्यांनाही शक्य होत नाही. नर्सिंग ब्यूरो मधून मदतनीस मिळतात पण ते एक दोन तासांसाठी येत नाहीत आणि आले तरी त्यांना पूर्ण पैसे द्यावे लागतात आणि हे सगळ्यांना शक्य नसते. अशा वेळी आजारी व्यक्तीच्या जवळच्या नातेवाईकांना मानसिक आधाराची गरज असते. आजारी व्यक्तीजवळ थांबण्यासाठी कोणीतरी हवे असते. अशा वेळी मिळालेला मदतीचा हात दिलासा देऊन जातो. तसेच ज्यांची मुलं परदेशी आहेत असे ज्येष्ठ पालक, एकटे राहणारे ज्येष्ठ यांना मदतीची गरज असते. हा मदतीचा हात BeingwithYou Help Foundation (Hand of Empathy Love Protection) ने पुढे केला आहे.

**आमची ठळक वैशिष्ट्ये**

१. रुग्णांच्या /ज्येष्ठांच्या जवळच्या नातेवाईकांच्या अनुपस्थितीत आमचे स्वयंसेवक तीन तास रुग्णाची /ज्येष्ठांची घरी किंवा हॉस्पिटल मध्ये सोबत करतात. ही सेवा पूर्णपणे विनामूल्य आहे.

२. रुग्णांना हॉस्पिटलमध्ये फॉलोअप साठी, डायलेसिस साठी, किमोथेरपी साठी नेणे.

३. एकट्या राहणाऱ्यांना मायनर ऑपरेशनसाठी नेणे.

४. एकट्या राहणाऱ्या ज्येष्ठांशी गप्पा मारणे, फिरायला नेणे, रेल्वे स्टेशन वर गाडीत बसवून देणे, उतरवून घेणे हे ही केले जाते.

५. दिनानाथ, सह्याद्री, पूना, संजीवन इत्यादी हॉस्पिटल्समध्ये आणि घरी ३००० तास सेवा दिली गेली.

६. पुण्यात १०० आणि मुंबईत ४० स्वयंसेवकांचे पथक